चांगल्या विचाराला वाहिलेली एक चळवळ

# विचार प्रसार

वर्ष चौथे    एप्रिल २००८    मूल्य रु. ३/-

संपादक - नारायण डोंगरे

## गुढीपाडवा

## नवे वर्ष - नवे विचार



## संपादकीय

गुढीपाडवा म्हणजे हिंदू नववर्षाचा पहिला दिवस. आपल्या नववर्षाचा पहिला दिवस. पण आपलीच माणसे परक्यांच्या नववर्षाचा पहिला दिवस जेवढ्या जल्लोषाने साजरा करतात, त्याच्या कितीतरी कमी पटीनींही आपला नववर्षाचा पहिला दिवस मात्र साजरा करत नाही

रात्री १२च्या ठोक्याला काळ्या आकाशात ना फटाक्याची आतषबाजी, ना दिव्यांची रोषणाई. ना फोनवर नवीन वर्षाच्या शुभेच्छा, ना ग्रिटींगच्या दुकानांत गिऱ्हाइकांची रेलचेल. काही घरांवर गुढी मात्र उभारतात. पण ती भल्या पहाटे न उभारता, आपल्या सोयीने सकाळी ९ किंवा १० वाजता. काही लोक हा सण साजरा करतातही. पण ते प्रमाण नगण्याच्या बरोबर.

ज्या धर्माची, जातीची माणसे संपू लागतात त्यांचे सण संपू लागतात. परंतु आज आपण संख्येने ९ कोटीपेक्षाही अधिक आहोत. जगात प्रमुख २० भाषा बोलणाऱ्या लोकांत आपल्या मराठी भाषेचा क्रमांक १६वा लागतो. पण आपण मराठी पालक आपल्या भाषेच्या शाळा वगळून इंग्रजी भाषेच्या शाळेत मुलांना शिकायला पाठवत आहेत. पूर्वी मराठी मुले

रक्षाबंधन, मकरसंक्राती यांसारखे सण साजरे करायचे. पण आता व्हॅलेंटाईन डे, रिबन डे, फ्रेंडशिप डे, न्यू इयर यांसारखे सण धुमधडाक्यात साजरे करत आहेत. आपल्या हातात सोन्याचे ताट घ्यायचे सोडून, आपण जेवणासाठी भिकाऱ्याच्या हातातील कटोरा घेत आहोत.

नवीन वर्ष सुरू होताना काही संकल्प करायचे असतात. नवीन वर्षात आपण कोणत्या गोष्टी धाडसाने केल्या पाहिजेत, नवीन वर्षात आपल्याला कोणती संकटे येऊ शकतात, आपल्याला कोणत्या वाईट सवयी वा व्यसने आहेत, आपल्यात कोठे कमीपणा आहे, आपण मागच्या वर्षीपेक्षा कोणत्या दुसऱ्या मार्गांनी दोन पैसे अधिक कमवू, नको असलेल्या कोणत्या माणसांचे दूरध्वनी क्रमांक आपल्या डायरीतून काढून टाकायचे... अशा सर्व गोष्टींचा विचार नववर्षाच्या पूर्वसंध्येला करायलाच हवा.

नवीन वर्षाच्या सुरुवातीला आम्ही मराठी माणसासमोरील समस्या, मराठी भाषेसमोरील समस्या, मराठी संस्कृतीसमोरील समस्या ह्यांचीच जाणीव करून देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

मुंबईत मराठी माणूस १८ ते २० टक्के व मुंबई शहर व मुंबई उपनगर मिळवून मराठी माणसाचे प्रमाण ३५ ते ४० टक्के एवढे आहे किंवा असेल. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री अमराठी माणूस असेल, असे महाराष्ट्र विधानसभेच्या अध्यक्षांचे मत आहे. मुंबईत मराठी माणूस अल्पसंख्याक होईल ही समस्या येईल म्हणण्यापेक्षा ती समस्यासच झाली आहे. ही समस्या सोडवायची असेल तर मराठी माणसांनी ८ नाही परंतु ३ तरी अपत्यांना जन्म देणे आवश्यक आहे. जेवढ्या जास्त अपत्यांना जन्म देईल तेवढा तो अल्पसंख्याकावरून बहुसंख्याक होईल. परंतु आज ते मराठी जनाला आणि मनाला शक्य नाही. त्यामुळे त्या समस्येवर विचार न करता ते काळावरच सोडलेले बरे.

दुसरी बाब म्हणजे मराठी भाषेची समस्या. मराठी भाषा आता एवढ्यात मरणार नाही. कारण तिला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. आपण तिच्याकडे पुरेसे लक्ष दिले नाही तरी ती अजून १००-१५० वर्षे तरी तगून राहू शकते. मराठी भाषेचे जीवन हे मराठी शाळेवर अवलंबून असते. मुंबईत मराठी शाळा कमी होत आहेत. मुंबई उपनगरांत मराठी शाळांच्या तुकड्या कमी-कमी होत आहेत. महाराष्ट्राच्या गावागावांत इंग्रजी माध्यमांच्या शाळा उघडल्या जात आहेत. मराठी शाळेत शिकविणारे शिक्षक आपल्या मुलांना मराठी शाळेत टाकत नाहीत, आणि समाजसेवा करणारे छोटे आणि मोठे राजकारणीही आपल्या मुलांना मराठी शाळेत टाकत नाहीत. आपण मराठी लोक दोन अपत्यांना जन्म देतोय व दोन्ही मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत नेऊन टाकतोय. परिणामी आज मराठी शाळा मरणार व खूप नंतर कॅन्सरच्या रोगाप्रमाणे हळू-हळू क्षय पावत मराठी भाषाही मरणार. ह्यावर उपाय म्हणून आपण आपल्या अपत्यांना 'सेमी इंग्रजी' किंवा एका मुलाला इंग्रजी शाळेत तर दूसऱ्या मुलाला मराठी शाळेत तरी टाकावे. तेही आपल्याकडून काही प्रमाणात अशक्यच आहे.

मराठी संस्कृतीसमोरील तिसरी समस्या किंवा आव्हान पाहू. 'संस्कृती'बद्दल बोलणेच आता बावळटपणाचे ठरेल. आपली मराठी संस्कृती बुडण्यापेक्षा हिंदू संस्कृतीच आता लोप पावू लागली आहे. 'खूप जास्त शिकलेले कमी लोक' आता संस्कृतीकडे येत आहेत. परंतु 'कमी शिकलेले जास्त लोक' हे आपल्यापेक्षा परकीय, युरोपिय, पाश्चिमात्य संस्कृतीच्या मागेच जास्त धावत आहेत.



Scanned with CamScanner

धोतर-नऊवारी साड्या केव्हाच काळाच्या ओघात मागे पडल्या. जात असलेल्या पिढीने (वय वर्ष ३५ ते ६०) व येत आलेल्या पिढीने (वय वर्ष २१ ते वय वर्ष ३५) आपल्या अंगावर पँट, परकर आणि मिनी स्कर्ट व मुलांनी कानात बाळ्या घालायला सुरुवात केली आहे. आई-वडीलही मुला-मुलींना हे ड्रेस लहानपणापासूनच आणून देत आहेत. घटस्फोटाचे प्रमाण आपल्या देशात वाढते आहे. २५-३० वयाच्या तरुण-तरुणीबरोबर ४५-५० वय झालेला वृद्धही घटस्फोट घेत आहेत. पुरुष घटस्फोट कोर्टाकडून मागत आहे तर स्त्रियाही मोठ्या प्रमाणावर घटस्फोटासाठी अर्ज करत आहेत. हा घटस्फोट प्रवाह दरवर्षी मोठा होत आहे. समलैंगिक विवाह येत आहेत, लग्नाअगोदर वाटेल तेवढे प्रेमप्रकरण करावेत, अशी संस्कृती पाऊल ठेवते आहे. फक्त मराठी माणसे आता 'संस्कृती रक्षणाचे कार्य' करू शकत नाही. त्यामुळे त्या समस्येचा विचारही न केलेला बरा.

सुशिक्षित लोकांनी "अशिक्षित माणसांनी निर्माण केलेली संस्कृती" तोडली आहे. तिचे अंत्यसंस्कारच व्हायचे बाकी आहे. १५-२० वर्षात तेही होतील. 'जात असलेल्या' व 'येत असलेल्या' दोन पिढ्यांनी येणाऱ्या पुढच्या पिढीची भाषा, संस्कृती आणि जीवन ठरवलेले आहे. आता येणाऱ्या पिढीकडूनच उद्याच्या चांगल्या, मांगल्या, संस्कृतीच्या अपेक्षा कराव्या लागणार आहेत. दीर्घकाळ टिकणारा बदल हा तातडीने होणार नाही. तो सावकाशच होणार. उद्याच्या पहाटे या बदलाचीही सुप्रभात होईल, अशी किमान अपेक्षा या हिंदू नववर्षात करायला काहीच हरकत नाही.

**- नारायण डोंगरे**

---

## फॅशन परेड

फॅशन परेड

जंगलात भरली प्राण्यांची सभा
कार्यक्रम ठरला 'फॅशन परेड'
मुंगी आली नेसून लुंगी
म्हणाली मी नाही काळी लुंगी सुंगी
माकडाने घातले टी शर्ट
बोलले नाही एक पण वर्ड
जिराफ आले चढवून जीन
कपडा लागला मीटर तीन
झबले घालून मांजर पुढे
म्हणे 'कॅटवॉक' माझेच खरे
कुत्र्याचे अंडरवेअर हॉट ॲन्ड हीट
स्टेजवर चालला अगदी धीट
हत्तीसाठी भला मोठा ड्रेस
टेलर म्हणाला उद्या भेट
हत्ती पिसाळला आपटली सोंड
टेलर घाबरला पळाला धूम

**दिलीप मो. चौधरा**

---

# हिंदूनववर्षाच्या सर्व वाचकांना, हितचिंतकांना हार्दिक शुभेच्छा!



Scanned with CamScanner

संस्कार कथा

# देव येत का नाही?

बेल झाली. प्रार्थना झाली. ध्यान झाले अन् ओंकारही झाले. शेवटी सरस्वती स्तवन झाले. मुलांनी कमललोचन उघडले. डोळ्यांसमोर शिक्षक असतानाही त्यांनी देवी संतोषीमातेचे दर्शन घेतले आणि सरांकडे पाहिले. आता सर काय बोलणार आहेत, याकडे मुलांनी कान टवकारले.

आज नेमके काय बोलावे, हेच सरांना कळत नव्हते. सरांच्या मनात तशा तीन-चार गोष्टी होत्या. पण एकीकडेही पूर्ण लक्ष लागत नव्हते. म्हणून सरांनी मुलांनाच प्रश्न केला, "मुलांनो, आज मी तुम्हाला कोणती गोष्ट सांगू?"

मुलांनी एका सुरात उत्तर दिले, "देवाची!" मुलांना देव आवडत होता नि देवाला लहान मुलांत कथेच्या माध्यमातून राहावेसे वाटत होते, असेच शिक्षकांना भासले.

सरांनी 'ठीक आहे,' असे म्हणून फळ्यावर 'देव आपल्याकडे का येत नाही?' असे एक वाक्य लिहिले.

सगळी मुले आता सरांकडे पाहू लागली. सर बोलू लागले, "देव आहे हे आपण यापूर्वी ऐकले आहे. आता तो असूनही आपल्याला का दिसत नाही ते सांगतो. द्वापार युग संपून जेव्हा कलीयुग सुरू झाले, तेव्हा देवतांनी ठरवले की पृथ्वीवर कोणीही कितीही घोर तपश्चर्या केली तरी प्रकट व्हायचे नाही. मुलांनो, हल्ली देव का प्रकट होत नाहीत ते मी तुम्हाला सांगतोच पण त्यापूर्वी जर देव भक्तांना प्रकट झाला तर काय होईल ते गोष्ट रूपाने सांगतो.

एके ठिकाणी तीघ जण बसलेले असतात. त्यांतील एक जापनीज असतो, एक नेपाळी असतो आणि तिसरा महाराष्ट्रीयन मराठी असतो.

देव भेटला तर बरे होईल असे ते बोलत असतात. देव कण-कणात भरलेला आहे. तो त्यांचे सर्व बोलणे ऐकतो. देव त्यांच्यापुढे येऊन त्या तिघांना दर्शन देण्याचे ठरवतो. त्याप्रमाणे योग्य वेळी तो तिघांना दर्शन देतो. तिघेही देवाच्या पाया पडतात.

देव त्यांना म्हणाला, "मी तुम्हांला प्रसन्न झालो आहे. तुम्हांला काय पाहिजे ते मागा". देव त्यांना एक वर मागण्यास सांगतो.

प्रथम जापनीज उभा राहतो व म्हणतो, "देवा, मला अमेरिकेतील सर्वात श्रीमंत माणूस बनव."

देव म्हणतो, "तथास्तु."

तो तिथून गुप्त होतो. अमेरिकेत त्याच्या हजारो कंपन्या, लाखो कारभार, शेकडो गाड्या, बंगले, नोकर-चाकर, अब्जो-खब्जोची संपत्ती प्राप्त होते.

देव आता नेपाळी माणसाला विचारतो, "तुला काय पाहिजे?" नेपाळी म्हणतो, "देवा मला रशियातला सर्वात श्रीमंत मनुष्य बनव."

देव म्हणतो, "तथास्तु."

तो ही तिथून गुप्त होतो, रशियात त्याच्या हजारो कंपन्या, फिरायला शेकडो गाड्या, तर घरावर हेलिकॉप्टर, विमान सर्व सर्व हवे ते मिळते.

आता देव शेवटच्या माणसाला विचारतो, "तुला काय पाहिजे?" तिसरा महाराष्ट्रीयन व्यक्ती म्हणतो, "देवा, ते दोघे गेलेत ना त्यांना इकडे आण. मला एकट्याला कसेतरीच वाटते."

देव म्हणाला, "तथास्तु."

पुन्हा ते दोघे - म्हणजे जापनीज आणि **नेपाळी** - पूर्वीच्याच अवस्थेत त्याच्या बाजूला



Scanned with CamScanner

वसतात. ते देवाला विचारतात, "देवा आम्हाला तू इकडे का आणलेस? आम्ही मागितलेले वैभव ऐश्वर्य परत का घेतलेस?"

देवाने उत्तर दिले, "जशी मी तुमची इच्छा पूर्ण केली, तशी मी या तिसऱ्याचीही इच्छा पूर्ण केली. त्यानेच तशी इच्छा माझ्यासमोर प्रकट केली होती. ह्या माणसाने त्याचा वर मागितला की तुम्ही इथे असावे. आता मी जातो."

शेवटी त्या दोघांनी पायातील चप्पल काढली **व त्यांनी त्याला बदडले.**

"अजून एक गोष्ट ऐका," असे म्हणून सरांनी दुसऱ्या गोष्टीला सुरुवात केली.

मुलांनो, देव जर तुम्हाला प्रसन्न झाला तर तुम्ही त्याच्याकडे स्वत:साठी पैसे मागाल, गाडी मागाल, बंगला मागाल, विदेशात जायची इच्छा प्रदर्शित कराल, कोणी अजून काही मागेल. पण माझ्यासारखा वाईट माणूस म्हणेल की देवा, तू ह्या सर्वांना मारून टाक. मग देव जसा तुम्हाला 'तथास्तु' म्हणेल, तसाच तो मलाही 'तथास्तु' म्हणेल. मग माझेही देवाकडचे मागणे पूर्ण होईल. तुम्हाला काही कळले का?

मुलांनी एकासुरात 'हो' म्हटले. मुलांची चांगलीच करमणूक झाली. ती अधूनमधून हसत होती. सरांनी त्या गोष्टीला अजून गोड करायचे ठरवले. त्यांनी अजून एक उदाहरण सांगायचे ठरवले.

एक गरीब माणूस होता. तो कसेबसे आपले घर चालवायचा. लक्ष्मी काही घरात यायला तयार नव्हती आणि गरिबी घराच्या बाहेर पडायला तयार नव्हती.

त्या गरीब माणसाने उपाय म्हणून प्रथम नारायणाची पूजा केली. परंतु ते प्रसन्न झाले नाहीत. मग त्याने ब्राह्मणाद्वारे लक्ष्मीची पूजा केली. ती तर अजिबात प्रसन्न झाली नाही. शवेटी त्याने महादेवाची निवड केली. त्याची पूजाअर्चा सुरू केली. अतिशय कडक व्रत केले. अखेरीस शंभू महादेव त्या गरिबावर प्रसन्न झाले. ते म्हणाले, "वत्सा, माग जे काही तुला पाहिजे ते."

गरिबाने महादेवाला आपली सारी कर्मकहाणी सांगितली. भोळ्या शंकराने प्रसन्न होऊन त्याला एक घंटा दिली व म्हणाले, "तू ही घंटा वाजवून जी इच्छा मनात धरशील ती पूर्ण होईल. तुला अन्न, धान्य, पैसा जे पाहिजे ते मिळेल."

भगवान शंकरांचे हे बोल ऐकूण त्या गरिबाला अतिशय आनंद झाला. त्याने पुन:पुन्हा महादेवाचे पाय धरले. थोडा वेळ तसाच निघून गेला. काहीसे आठवल्यासारखेकरून महादेवांनी त्या गरिबाला सांगितले की तुला एक गोष्ट स्पष्ट करायची राहूनच गेली. ती म्हणजे जे तू मागशील त्याच्या दुप्पट तुझ्या शेजाऱ्याला मिळेल. जा आता आणि जे हवं ते मिळव. असे म्हणून महादेव अंतर्धान पावले.

त्यानंतर गरिबाची विचारचक्रे सुरू झाली. तो मनातल्या मनात म्हणू लागला की मी शंभर रुपये मागितले तर माझ्या शेजाऱ्याला दोनशे मिळतील... मी एक किलो मिठाई मागीतली की माझ्या शेजाऱ्याला फुकटची दोन किलो मिठाई मिळेल... या विचाराने त्याचे मन जळू लागले. त्या विचारातच तो घरी आला. घरी तर पोहोचला. पोटात आगीचा डोंब उठला होता. परमेश्वराने प्रसन्न होऊन दिलेली घंटा तर हातात होती. पण पंचपक्वान्ने मागण्याची त्याची हिम्मत होत नव्हती. कारण शेजारच्याला विनाकारण दुप्पट पंचपक्वान्ने मिळतील. त्याने ती घंटा घरात टांगवून ठेवली वा बायकोला चतकोर भाकर आणि चटणी आणायला सांगितली. त्यावरच त्याने समाधान मानले.

दुसऱ्या दिवशी सकाळी खांद्यावर उपरणं घेतलं आणि चार पैसे कमाविण्यासाठी काम शोधायला तो माणूस बाहेर पडला गेला. त्याने नुसती घंटी



Scanned with CamScanner

वाजवली असती आणि १० रुपये मागितले असते तरी मिळालेले असते परंतु बाजूच्याला २० मिळतील म्हणून पैसे न मागता उन्हातान्हातून काम शोधत राहिला.

आठवडा - दोन आठवडे तो बाहेर पैशासाठी फिरू लागला, काम करू लागला. इकडे एक दिवस त्याच्या बायकोने सर्व भांडी घासायला काढली. त्यात ती घंटाही घेतली. घंटा घासत असताना ती वाजली. घंटा वाजताबरोबरच पुढे देवदूत उभा राहिला. गरिबाची बायको हुशार होती. तिला ती जादूची घंटी आहे हे समजले. त्या देवदूताने काय पाहिजे ते मागायला सांगताच तिने अन्न मागितले ती पोटभर जेवली. सगळी भांडी घासून घेतली. दुसऱ्या दिवशी घंटा वाजवली, लाखो रुपये मागितले, स्वत:चे घर दुमजली करून मागितले. तिला पैसे मिळाले, घरही दुमजली झाले. घरात नवनवीन वस्तू आल्या. तिने पुन्हा घंटा वर ठेवली.

नवरा १०-१२ दिवसानंतर घरी आला पाहतो तर काय, आपल्या आळीचा चेहरामोहराच बदललेला. तो समजून गेला की देवाने प्रसन्न होऊन आपल्याला दिलेली घंटा बायकोच्या हातात पडली.

तो थेट घरात आला नि बायकोला विचारू लागला, "तुला घंटा मिळाली ना?" ती म्हणाली "हो, आणि हे सगळे वैभव बघा किती मिळाले ते!"

तो म्हणाला, "गप्प बस, बाजूच्यांच्या खोल्या बघ चार-चार माळ्याच्या झाल्यात त्या. आपल्या दुप्पट त्यांना मिळाले."

ती म्हणाली, "आपल्याला काय करायचे त्यांचे, आपण सुखी आहोत ना? मग बस!"

तो म्हणाला, "काही बोलू नकोस, आण ती घंटा इकडे पहिली." बायकोने निमूटपणे घंटा आणून दिली त्याने ती घंटा जोरजोरात, पटापट वाजवली, देवदूत पुढे हजर झाला.

तो म्हणाला, "घंटे माझा, माझ्या बायकोचा, मुलाचा एक डोळा फुटू दे." लगेच त्याचा, त्यांच्या बायकोचा एक डोळा फुटला. ते एका डोळ्याने अंधळे झाले. त्याचवेळी शेजारच्या माणसांचे व त्यांच्या बायकांचे दोन्ही डोळे फुटले.

त्यांनी पुन्हा घंटा जोरजोरात वाजवली व म्हणाला, "हे घंटे, माझ्या घराच्या दरवाज्याच्या बाहेर विहिरी खोद." लगेच त्याच्या घराच्या एका दरवाज्याच्या बाहेर विहीर खणली गेली तर बाजूच्यांच्या दोन्ही दरवाजाच्या बाहेर विहिरी खणल्या गेल्या.

शेजारची माणसे अगोदरच आंधळी झाली होती. ती घराच्या बाहेर पडली नि थेट दरवाजासमोरच्या विहिरींत पडली. त्यातच त्यांचे निधन झाले. त्यांचा विनाश झालेला पाहून त्या माणसाला आनंद झाला.

सरांनी गोष्ट संपवली ही गोष्ट ऐकल्यावर मुले जोरजोराने हसू लागली. थोड्या वेळाने त्यांनी मुलांना विचारले, "देव प्रसन्न झाला, तो दिसू लागला तर काही लोक स्वत:चा फायदा करून घेतील, काही समाजाचे कल्याण चिंततील पण काही साऱ्या समाजाचा विनाश व्हावा, अशीदेखील इच्छा देवाकडे प्रकट करतील, आणि देवही त्यांना तसा आशीर्वाद देईल. त्यातून पृथ्वीचाच विनाश होईल. मग मला सांगा, यावे का देवाने, दिसावे का त्याने सर्वांना?"

मुलांनी एका सुरात सांगितले, "नाही!" सर म्हणाले, "मग आता समजले का, की देव का येत नाही ते?"

मुलांनी परत एकत्र उत्तर दिले, "हो, सर."

बेल वाजली. सरांनी आपल्या साऱ्या वस्तू आवरल्या आणि दुसऱ्या वर्गात निघून गेले.

-एस. पवार.



Scanned with CamScanner

# प्रासंगिक होलिकोत्सव आणि गुढीपाडवा

इंग्रजी दिनदर्शिकेनुसार मार्च-एप्रिल दरम्यान म्हणजेच फाल्गुन, चैत्र महिन्यात 'होळी' व 'पाडवा' हे पवित्र सण येतात. त्या सणांची पार्श्वभूमी, कथा व सण-महात्म्य सर्व लोकांस पुन्हा नव्याने ज्ञात होणे ही काळाची गरज आहे.

**होळी :-** फाल्गुन शुध्द पौर्णिमेला होळी हा सण येतो. या सणास होलिकोत्सव, हुताशनी पौर्णिमा किंवा 'शिमगा' असेही म्हणतात. हा सण पुराण काळापासून चालत आला असून त्याची मोठी परंपरा आहे.

होळीच्या दिवशी गावाच्या मध्यभागी मैदानात एक खड्डा खोदून त्यात सुपारी, आंवा, भेंड वगैरे झाडांची फांदी वा झाड (लहान झाड) पुरतात. झाडाला फुलांच्या माळांनी सजवितात. होळी सभोवतालची जागा सुंदरपणे सारवतात. त्यावर रांगोळ्या काढतात. होळीच्या खांवाभोवती होळकूंडे, गोवऱ्या वगैरे व्यवस्थितपणे रचतात. होळी पेटविण्यापूर्वी बायका होळीची पूजा करून होळीला नैवेद्य अर्पण करतात. काही बायका फेर धरून परंपरेने चालत आलेली व स्वरचित अशी गाणी म्हणतात. या स्वरचित गाण्यात गावातील काही लोकांच्या उखाळ्या-पाखाळ्याही असतात. परंतु होळीच्या दिवशी हे सर्व क्षम्य मानायचे असते.

होळी पेटविल्यावर नवपरिणीत जोडपी तसेच अन्य लोकही होळीभोवती प्रदक्षिणा घालतात व होळीला ऊस, नारळ वगैरे अर्पण करतात. होळीच्या दिवशी पहाटेच्यावेळी आंब्याचा दवाने भरलेला मोहोर आणून तो दव जमा करून त्यात दूध, मध, केशर, तूप, दही मिसळून ते तीर्थाप्रमाणे प्राशन केल्यास दीर्घायुष्य व आरोग्य लाभते व केलेले संकल्पही सिद्धीस जातात. असा समज आहे.

होळी या सणासंबंधी अनेक कथा व आख्यायिका प्रसिद्ध आहेत. असे म्हणतात की,

ढुंढला नावाच्यास राक्षसिने शिव-पार्वतीची तपश्चर्या करून असा वर मिळविला होता की, होळीच्या दिवशी जे बाळ माझ्या नजरेस पडेल ते मला खायला मिळाले पाहिजे. शंकराने हा वर देताना ढुंढला राक्षसीला एक अट घातली की जे मूल सदर दिवशी बीभत्स चाळे करीत असेल, चोरी करीत असेल किंवा मोठ्याने ओरडत असेल अशा मुलास तुला खाता येणार नाही. तेव्हापासून राक्षसीपासून वाचण्यासाठी अचकट-विचकट बोंबा मारणे, लहान-सहान चोऱ्या करणे, अभद्र बोलणे वगैरे प्रथा चालू झाली आहे. आपल्याकडेही, "होळी रे होळी... पुरणाची पोळी... गावचा पाटील मदन कोळी" किंवा "आज होळी... उद्या पोळी... अमूकअमूक मेला संध्याकाळी... त्याचे दिवस मंगळवारी," अशा बोंबा मारल्या जातात. अर्थातच होळीच्या दिवशी हे सर्व क्षम्य असते. दुसरी कथा सांगतात की -

हिरण्यकश्यपू नावाचा एक राक्षस राजा होता. त्याला सर्वत्र हिरण्य म्हणजे सोनेच दिसत असे. तो भोगवादी राजा होता. तो परमेश्वर वगैरे काही मानीत नसे. पण त्याच्याच घरी प्रल्हादासारखा भक्त जन्माला आला. प्रल्हादाची आई गरोदर असताना नारद मुनींच्या आश्रमात राहिली होती. तेथील वातावरणाचा व संस्कारांचा परिणाम गर्भावस्थेतल्या प्रल्हादावर होऊन तो भगवद्-भक्तच बनला. प्रल्हादाचा ईश्वरवाद सर्वत्र पसरला तर आपले भोगवादी राज्यच नाहीसे होईल अशी भीती हिरण्यकश्यपूस वाटू लागली. म्हणून प्रल्हादालाच संपविण्याचे त्याने



Scanned with CamScanner

ठरविले. एक प्रदिप्त अग्नी पेटवून त्या अग्नीत बाल-प्रल्हादाला फेकून देण्यात आले. परंतु काय आश्चर्य! सद्प्रवृत्त प्रल्हाद हसत-हसत अग्नीतून बाहेर आला. जगात सद्प्रवृत्तीचे लोक कमीच असतात पण व्यापक असद्प्रवृत्ती त्यांना जाळू शकत नाही असा अनुपम संदेश फाल्गुन शुद्ध पौर्णिमेस घडलेल्या प्रल्हादाच्या कथेवरून प्रत्ययास येतो.

होळीच्या दुसऱ्या दिवशी एकमेकांच्या अंगावर गुलाल उधळून, रंग उडवून धुळवड खेळतात. याच दिवशी निरनिराळ्या प्रकारची सोंगे घेऊन वाद्ये वाजवत नाच करीत शिमगा साजरा करतात. जणूकाय या धुळवडीच्या माध्यमातून अधम विचारांचे व अप-प्रवृत्तींचे दहनच केले जाते.

**गुढी पाडवा :-** चैत्र शुद्ध प्रतिपदा या दिवसालाच गुढीपाडवा असे म्हणतात. साडे-तीन मुहूर्तांपैकी तो एक मुहूर्त आहे. ह्याच दिवशी ब्रह्मदेवाने हे जग (सृष्टी) निर्माण केले, दुष्टांचा नाश करून सज्जनांचे रक्षण करण्यासाठी भगवान विष्णूने प्रथमच मत्स्यावतार धारण केला, प्रभू रामचंद्राने वालीचा वध करून प्रजाजनांची वालीच्या दास्यातून सुटका केली, वनवास समाप्तीनंतर प्रभू रामचंद्र अयोध्येत परत आले, राजा शालीवाहनाने शालीवाहन शकाची सुरुवात केली, त्याचप्रमाणे सर्व ऋतूंचा राजा वसंत याच दिवसापासून सुरू होतो. अशा अनेक गोष्टींमुळे गुढी-पाडव्यास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. गुढी-पाडव्याचा सण हा त्यासम-तोच असा आहे.

गुढी-पाडव्यासंबंधी पुराणात सांगितलेली कथा अशी आहे. पूर्वी चेदी देशात वसू नावाचा राजा राज्य करीत होता. त्याची प्रजा सुखी व समाधानी होती. पुढे वसू राजास वैराग्य प्राप्त झाले. त्याने अरण्यात जाऊन घोर तपश्चर्या केली. वसू राजाला इंद्र प्रसन्न झाला. त्याने राजाला वेळुची काठी व वैजयंतीमाला देऊन परत राज्यांत जाऊन राज्य करण्यास सांगितले. राजा राज्यात परतल्यावर प्रवेश-द्वाराजवळच त्याने त्या वेळुच्या काठीची पूजा केली. काठीवर लहानसा कलश (गडू) उपडा ठेवला. काठीवर भरजरी रेशमी वस्त्र ठेवून फुलमालांनी काठी सजविली. काठीस वर कडूलिंबाचे ढाळे (लहान डहाळी) व खोबऱ्याच्या वाट्यांची माळ करून लावली व गुढीचे मन:पूर्वक पूजन केले. तो दिवस गुढी-पाडव्याचा होता. तेव्हापासून आजपोवतो गुढी उभारण्याची प्रथा रुढ झाली.

गुढी-पाडव्याच्या दिवशी कडूलिंबाची पाने, काळे मिरे, हिंग, साखर, जिरे, धणे, सूंठ, ओवा यांचे बारीक कूट करून प्रसाद म्हणून भक्षण करतात. या प्रसादामूळे आपल्याला उत्तम आरोग्य लाभून बुद्धी तेजस्वी होते. या दिवशी घरोघरी, श्रीखंड, पुरणपोळ्या, जिलेबी वगैरेंचे गोड-धोड जेवणही सर्वजण एकत्र बसून करतात व वर्षाचा पहिला दिवस आनंदाने साजरा करतात. लोक या मुहूर्तावर अनेक नवीन कामांना सुरुवात करतात.

राजा शालीवाहनाच्या काळात शक लोकांची राज्यावर सातत्याने आक्रमणे होत होती. शक, ठग, पेंढारी लोकांच्या टोळ्या अकस्मात हल्ला करून मारझोड करून लुटमार व जाळपोळ करीत. त्यामुळे प्रजा हैराण होऊन मेटाकुटीस आली होती. अशावेळी राजा शालीवाहनाने आपली सेना सज्ज करून मोठा पराक्रम गाजवून त्याने शक लोकांचा पाडाव केला व प्रजेला भयमुक्त केले. राजा शालीवाहनाने या विजयाबद्दल आपल्या नावाने 'शालीवाहन शक' या नवीन कालगणनेस प्रारंभ केला. शालीवाहन शक आजही कालगणनेत अस्तित्वात आहे. शालीवाहन शक इसवी सनावळीच्या ७८ वर्षे मागे आहे. म्हणजेच सध्या इसवी सन २००८ चालू आहे तर शालीवाहन शक १९३० चालू आहे.

***श्री. रमाकांत त्रिंबक ठाकूर***



Scanned with CamScanner

# संवेदना बोथट की...

पर्यटन केल्याने माणसाच्या विचार-दृष्टीच्या कक्षा रुंदावतात, व्यक्तिमत्वाला व्यापक सभोवतालात वावरण्याची सवय वगैरे लागते हे देखील मान्य. परंतु ह्या सर्वांचा फायदा काय? नाही. तो आहेच. हे मान्य. परंतु आजचा माणूस ह्या साऱ्या जगभरातील गोष्टी कोणत्या संवेदनशीलतेने पाहतो आणि त्यानुसार वागतो, हा विषयदेखील चर्चिण्यासारखा आहे. एरवी माणसं नायगारा पाहातात आणि, "अबब..." म्हणत तोंडात गेलेलं बोट पाच मिनिटं काढत नाही. तेच विश्राम बेडेकरांसारखा लेखक जेव्हा नायगारा पाहतात तेव्हा, 'एकदाच सुंदर होण्यासाठी हे पाणी आपला कपाळमोक्ष करून घेते, हा वेडेपणाच नाही का?' असं पटकन् बोलून जातात. इथियोपियातलं दारिद्र्य आणि कुपोषित बालकं अनेकजण पाहात असतील, परंतु, उन्हात राहिलेल्यांसाठी सावलीत असलेल्यांनी काहीतरी केलं पाहिजे. आपल्या भरलेल्या थाळीतील थोडं दिलं पाहिजे, असं तात्यासाहेब शिरवाडकरच म्हणून जातात. असो.

नुसत्या बसच्या खिडकीबाहेर प्रवासात पाहत बसलं ना तासन् तास तरी खूप भर पडते अवलोकनात आणि माहितीत. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागातील एका बाईचा सहा मैलांवरून एक हंडा पाणी उपसणे (खरं तर डबकं खरवडून) हाच दिवसभरातला जगण्याचा उद्योग असतो. "साहेब, मला हितं ठार मारा न् त्याची फिलिम मंत्र्यान्ला दाकवा, कदाचित तवातरी त्याईनचं डोळं उघडतील," असं ती स्त्री डॉक्युमेंटरीसाठी चित्रिकरण करायला गेलेल्या आमच्या एका दिग्दर्शक मित्राला म्हणाली. आणि अंगावर ओरखडा पडला. ही एक स्त्री, दुष्काळातील कुठे आणि आम्ही टि.व्ही.वर पाहाणारी अंगावर तुषार झेलणारी पाण्यात म्हशीसारख्या बसलेली जाहिरातीतील मॉडेल कुठे? उस्मानाबादमधील 'हॅलो मेडिकल' प्रकल्पाचे डॉ. शशिकांत अहंकारी ह्यांच्या तोंडून तेथील आदिवासींचे आरोग्यासंबंधीचे आकलन ऐकले तर, ती माणसं आणि आम्ही एकाच ग्रहावर राहणारी आहोत कां ह्याचा संभ्रम पडतो. बाळंतपणानंतर, बाळंतिणीच्या पोटावर दुसरी एक स्त्री चक्क उभी राहते वार बाहेर काढण्यासाठी, हे ऐकलं तेव्हा अंगावर सरसरून काटा आला. ह्या साऱ्या घटनांशी आपला संबंध आहे की नाही ह्याचा अंतर्मुख होऊन विचार करावासा वाटतो. शेतकरी आत्महत्या करतो. तो कां करतो ह्यावरच चर्वितचर्वण झाले आणि त्याला राजकीय रंग चढवले. मूळ प्रश्न तसाच आहे. उद्या आणखी आत्महत्याप्रवण शेतकरी तयार होतील. ज्या देशातल्या अर्थशास्त्रातील 'अन्न, वस्त्र आणि निवारा' ह्या मूलतत्त्वांचा पाठीराखा आणि संवर्धक जो बळीराजा आहे, तोच दरिद्री. आणि म्हणे आमची अर्थव्यवस्था कृषिवर आधारलेलीच आहे. कृषिवर उभ्या असलेल्या अर्थव्यवस्थेतील शेतात राबणारा शेतकरी मात्र दलालाच्या हातातली कठतुतळी. ही इंडीयन लाफ्टर शोमधील सर्वात 'ब्लॅक कॉमेडी' आहे. असो.

बऱ्याचदा, बऱ्याच-लोकांची भूमिका 'आपलं कोण ऐकणार आहे, ज्यांनी हे करायला पाहिजे ते करीत नाहीत,' इतकी तटस्थपणाची असते. त्यामुळेच आपल्या घरातील वर्तमानपत्रे, मासिकं, टि.व्ही.चॅनल्स ह्यांमधून प्रसारीत केलं जाणारं एकूणच चित्र हळूहळू वास्तवाचा परिघ ओलांडून पार कल्पनेच्या पलिकडे जाऊन पोहोचते आणि त्या स्वप्नरंजनात प्रेक्षकदेखील वाहवत



Scanned with CamScanner

जातो, शेखचिल्लीसारखा. 'हे माझं, आमचं चित्रण नाही' हेच पार विसरून जातो आपण. कॅमेरा नावाचं मशीन काय वाटेल ते चित्रित करेल हो आपल्या मोठ्या क्षमतेच्या लेन्सने. परंतु त्या कॅमेऱ्यामागचा डोळा तर माणसाचा आहे ना? मग त्या माणसालाच आता थांबवलं पाहिजे. दिवसभर गोंगाट, तणाव, प्रदूषणात राहूनही संध्याकाळी तशाच प्रकारच्या ताणतणावाच्या मालिका समस्त मध्यमवर्गीयांमध्ये पाहिल्या जातात. नव्हे, त्या चुकल्या तर चिडचिडेपणा येतो लोकांमध्ये. शर्ट बदलावा तितक्या सहजपणे मालिकेतील पुरुष, स्त्री बदलतो, स्त्री-पुरुष संबंधातील स्वैराचाराचं इतकं वारेमाप चित्रण पाहून ह्या देशातील पंचाण्णव टक्के घरात असंच चालतं, असंच वाटायला लागतं. ते खरं आहे का? नाही ना? मग हे दाखविलं जाणारं चित्रण आमचा अपमान आहे असं कुणाला का वाटत नाही? की आपण इतका भारी शर्ट वापरू शकत नाही म्हणून त्याचं केवळ दर्शन घेऊन समाधान मानून घेऊ, हाच विचार असतो! असो.

फिल्मसिटीत एकदा एका मोठ्या दिग्दर्शकाने मला वास्तव दाखवलं. लंच टाईममध्ये, एक्स्ट्रा, तंत्रज्ञांनी खाऊन टाकलेल्या उष्ट्या अन्नाच्या मोठ्या राशीवर / ढकिरड्यावर ते वेचण्यासाठी शंभरेक मुलांची झुंबड उडालेली त्यांनी मला दाखविली व म्हणाला, "आप जो फिल्म देखते हो ना, वो सपना होता है... हकिकत तो दरअसल यह है"

आपल्या देशात आजही ७७% लोकांचे दरडोई उत्पन्न १०० रुपयांच्या वर नाही. आणि ग, म, भ, न आणि १ ते १० आकडे काढता येणं म्हणजेच साक्षरता असं नसेल तर पासष्ट टक्के विद्यार्थ्यांच्या मार्गात अजून शिक्षण नावाचं क्षेत्र अजून आलेलंच नाही. चार सहाच पंचतारांकित हॉस्पिटल्समधून जर योग्य वैद्यकीय उपचार मिळू शकत असतील तर ऐंशी टक्क्यांच्या वाट्याला ती सेवा येऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. 'अंधार माझा सोबती' ठरलेल्या महाराष्ट्रातील सत्तर टक्के ग्रामीण भागात 'पॉवर आली' ही बातमी असते. त्याच मुंबईतील पेपरात, मुंबईत 'पॉवर गेलीच काही मिनिटांसाठी' तर ती बातमी ठरते. ही विसंगती डोकं फिरवणारी.

ह्या साऱ्या गदारोळात आता संवेदनाशून्य राहायचं मुग गिळून गप्प बसून, की 'नाही' म्हणायला लागायचं, हे ठरविण्याची वेळ आली आहे. Evil produces by the silence of good people. आणि आमचा समाज निश्चितच अशा शहाण्या लोकांचा आहे. उठसूट हसीमजाकवाली छबी झळकवून घेणाऱ्या नटमोगऱ्या राज्यकर्त्यांना 'आता जरा गंभीर व्हा' हे सांगण्यात माझ्या माहितीप्रमाणे कोणताच गुन्हा नाहीये.

**- *संदीप राऊत***

## घडलेला विनोद

सुरभि : बाबा, यंदा मी परीक्षेत उत्तरपत्रिका काळी करून टाकणार.

बाबा : म्हणजे?

सुरभि : बाबा, अहो, लोडशेडींगमुळे अभ्यास करताना जर आम्हाला पुस्तकातले आकडे न् अक्षरं अंधारातही दिसू शकत असतील (अशी 'त्यांची' अपेक्षा असेल) तर मग कोळशाने काळ्या केलेल्या उत्तरपत्रिकेवरील आकडे न् अक्षरं परीक्षकांना का वाचता येऊ नयेत?


बाबा : ??काय??



Scanned with CamScanner

# संगणक :
# काळाची गरज की खेळणे?

३ फेब्रुवारी १९८९ची संध्याकाळ. मुंबईच्या चौपाटीवर पाय ठेवायलाही जागा नव्हती. चौपाटीच्या सागरकिनाऱ्यावर अथांग जनसमुदाय होता. हा जनसागर कोठे संपतो हे कळतच नव्हते. फ्रेंच महोत्सवाच्या प्रारंभानिमित्त हे लोक जमा झाले होते. लेझर झोतांच्या मांडवाखालचे ते अपूर्व मीलन हा आमच्यासारख्यांच्या जीवनातील एक अविस्मरणीय अनुभव होता. मनुष्य संगणक युगात जाऊन पोहोचला आहे. त्याची ही साक्ष होती.



गेल्या काही वर्षात विज्ञानक्षेत्रात जे काही शोध लागत आहेत त्यामध्ये संगणकाचा स्पर्श सर्व ठिकाणी जाणवतो. असा हा संगणक इलेक्ट्रॉनिक्सच्या क्रांतीच्या अग्रणी आहे. शेतीचा शोध व औद्योगिक क्रांतीनंतर होणाऱ्या तिसऱ्या स्थित्यंतराचा तो नेता आहे. आपल्याबरोबर त्याने माहितीयुगाची पहाट आणली आहे. ज्ञान अनंत आहे. पण अहर्निश वाढत जाणाऱ्या त्या ज्ञानाला लीलया पेलण्याची संगणकाची क्षमता आहे. संगणकाच्या कार्यामध्ये आईनस्टाईनची प्रतिभा, टेनिसनची कल्पनाशक्ती आणि बॉबी फिशरची प्रगल्भता यांचा मिलाफ आढळतो. वेग, अचुकता आणि निर्णयक्षमता या तीन गुणांमुळे संगणकाला स्वप्नवत सामर्थ्य प्राप्त झाले आहे.

अवकाश संशोधन, शेती, हवामानाचा अंदाज, मासेमारी, कारखानदारी, संरक्षण या सर्व क्षेत्रात संगणकाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. भारतासारख्या कृषिप्रधान देशात या संगणकाची विशेष गरज आहे. स्वातंत्र्यानंतर अजूनही आमची शेती लहरी पावसावरच अवलंबून आहे. अशा वेळी अवकाशातील उपग्रहावरून पावसाचे किंवा वादळी वाऱ्याचे पूर्वसंदेश मिळाल्यास त्याचा शेतकऱ्यांना निश्चितच उपयोग होईल. भारतातील भूगर्भात प्रचंड प्रमाणात खनिजसाठे आहेत. पेट्रोलसारख्या खनिजतेलामुळे अरबस्तानासारखे देश मध्यंतरीच्या काळात किती श्रीमंत झाले ! भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर असे असंख्य खनिजतेल साठे असण्याची शक्यता आहे. खनिजतेलाइतकीच आज आपल्याला आवश्यकता आहे अणुउर्जेची. कारण हे तेलसाठे केव्हातरी संपणार आहेत.

समृद्ध युरेनियम किंवा इतर खनिजतेल कोठे मिळू शकते ते आपल्याला संगणकाकडून कळते. आज संगणक मनोरंजनाच्या क्षेत्रातही नवी क्षितिजे खुली करत आहे. आपल्या दैनंदिन जीवनातही आज संगणक आपला मित्रच आहे. आज रेल्वे, एस.टी. यांच्या आरक्षणाची सोयही संगणकाच्या साहाय्याने केली जाते. वैद्यकशास्त्राचा

विचार केला तर पूर्वी मानवाचा शारीरिक तपास हा 'क्ष' किरणांच्या साहाय्याने होत असे. परंतु आता मात्र मानवाच्या सर्व अवयवांच्या चाचण्या म्हणजे शरीरांतर्गत सर्व गोष्टी निरनिराळ्या उपकरणांमुळे स्पष्टपणे दिसू शकतात. तात्पर्य, संगणक आज काळाची गरज बनला आहे.

आता असे म्हणावेसे वाटते -

'कायदा पाळा गतीचा
काळ मागे लागला
थांबला तो संपला.'

या तत्त्वानुसार जो संगणकाबरोबर धावणार नाही त्याला करंटाच म्हणावे लागेल.

संगणकाने साऱ्या मानवजातीवर जादू केली आहे. त्याच्या या करामतीमुळे भारावून जात असताना 'एका कंपनीने सुपर कॉम्प्युटर बाजारात आणले व त्यामुळे पाचशे कामगार बेकार झाले' अशी बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळाली. ही बातमी वाचताच संगणक वापरातील किंवा राबवण्यातील भयानकता जाणवू लागली. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात अनेकांना बेरोजगार करून एकाला अधिक श्रीमंत करणारा हा राक्षस नव्हे ना? अशी शंका आल्यावाचून राहत नाही. जगात सर्वत्र समाजवादाचा घोष होत असताना भांडवलशाही समाज रचनेला हा पूरक तर होणार नाही ना? अशी शंका येते. देव, दैत्य आणि जादूगार या तिन्ही स्वरुपात हा संगणक जाणवू लागतो. अकुशल माणसे संगणकाला माहिती पुरवत असताना एवढ्या प्रचंड चुका करतात की त्यामुळे शेकडो लोकांचे नुकसान होते. विद्यार्थ्यांचे भवितव्य ज्या परीक्षेत ठरत असते त्या दहावीच्या परीक्षेच्या निकालात ६५ ऐवजी ३५ असे चमत्कार जेव्हा संगणक करतो तेव्हा दुरून डोंगर साजरे असे या संगणकाचे होणार की काय असे वाटते. दिवसेंदिवस आपण संगणकामुळे श्रमशक्तीचा वापर कमी करून परावलंबी होत आहोत. संगणकामुळे आपल्या बुद्धीसामर्थ्याचाही वापर कमी होऊ लागेल व अशाप्रकारे आपल्या नैसर्गिक क्षमतांच कमी होऊ लागतील. या शिवाय नैसर्गिक कलाविकासात संगणकामुळे अडसर तर निर्माण होणार नाही ना? आज आपण संगणकाच्या माध्यमातून चित्रकलेचा आस्वाद घेतो पण त्यामुळे मूळस्वरूपातील चित्रकलेचा आनंद लुप्त होत आहे. कला, साहित्य, संगीत यांचा मानवी भावनांशी संबंध आहे. संगणकयुगात या मानवी भावनाच नष्ट होतील व एक भावनाशुन्य यांत्रिकी जीवन मनुष्य जगू शकेल. व्यक्तीच्या खाजगी आयुष्याचे नियंत्रण करण्यापासून ते राष्ट्राच्या संरक्षणाविषयी गुपीते मिळविण्यापर्यंत संगणकाचा उपयोग होईल व माणसामधील दानवी प्रवृत्ती वाढीस लागेल. पण अखेरीस संगणक हे यंत्र आहे. माणसाचा मेंदू हा सर्वात मोठा कॉम्प्युटर आहे. या अजस्त्र व गुंतागुंतीच्या संगणकामधून 'संगणक' खेळणे निर्माण झाले आहे.

संगणकाची उपयुक्तता परिस्थितीसापेक्ष असली पाहिजे. संगणकाचा सर्वांगीण वापर करण्याआधी आजच्या माणसाचा आर्थिक, शैक्षणिक स्तर त्या प्रमाणात उंचावला आहे काय, हाही विचार झाला पाहिजे. एरवी 'मोबाईल'ची पर्यायाने टेलिकम्युनिकेशनची मर्यादा अणि कार्यक्षमता नुकत्याच झालेल्या मुंबईतील नैसर्गिक हलकल्लोळात स्पष्ट झाली आहेच.

ह्या पार्श्वभूमीवर संगणकाबद्दलही हेच म्हणता येईल. संगणकाचा गुलाम बनण्यापेक्षा माणसाने संगणकालाच गुलाम बनविणे श्रेयस्कर आहे. स्वतःचे हित-अहित चांगल्या प्रकारे जाणणाऱ्या आजच्या माणसाकडून हेच अपेक्षित आहे. कारण संगणक हवंहवंसं खेळणंही आहे आणि काळाची गरजदेखील आहे.

**- सौ. प्रतिभा हर्षद पाटील**



Scanned with CamScanner

# शाळा / महाविद्यालये / वाचनालये यांना वार्षिक सभासदत्वासाठी आवाहन

काही अपरिहार्य कारणामुळे आम्हाला विचार प्रसार या मासिकाची किंमत २ /- रुपये करावी लागली. आमचे विचार सर्वांपर्यंत पोहोचावेत, समाजात रुजावेत, शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत ते पाझरावेत असे आम्हाला वाटते. आमची प्रामाणिक इच्छा व वस्तुस्थिती यात बरेच अंतर आहे. हे अंतर कमी व्हावे व आमच्या वाचकांची संख्या वाढावी म्हणून आम्ही वार्षिक सभासदाची योजना पुढे आणत आहोत. वार्षिक सभासद होणाऱ्याला हे मासिक केवळ एक रुपयात मिळणार आहे. त्यांनी वार्षिक सभासदत्वासाठी आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि वर्षाचे बारा रुपये (धनादेश, मनी ऑर्डर अथवा रोख स्वरुपात) आमच्या पत्त्यावर पाठवावेत. त्यांना अंक पोस्टाने पाठवण्याची आम्ही व्यवस्था करू. कोणतीही चळवळ ही एकमेकांच्या सहकार्याशिवाय पुढे वाटचाल करू शकत नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. आम्हीही हे सत्य नाकारत नाही. आमचा पत्ता आहे -

श्री. राजेंद्र ग. डोंगरे, ७/१, डोंगरे सदन, परेरा वाडी, साकीनाका, मुंबई - ४०० ०७२


contact (022) 28504088

**BENEDICT**

**PRINTERS**

**SPECIALIST IN :**
**OFFSET, SCREEN, LETTER PRESS**
**ALL TYPES OF BOOK BINDING AND D.T.P.**

**D'SOUZA SADAN, NO. 1, NEAR ANAND BABA ASHRAM, BEHIND**

With Best Compliments From
*Hari Kumar*

# HARI SHREE ALUMINIUM WORKS

ALUMINIUM DOORS, WINDOWS RAILINGS,
SINTEX DOOR, PARTITION & ALL ALUMINIUM WORKS

Gala No. 5, Dongre Sadan, Sakinaka, Mumbai - 400 072
Off. C/o. : 2859 2948, 2852 6208
Mob. : 9821624312 Res. : 5601 8030

# KANNA
## TOURS & TRAVELS

BUS, CARS, QUALIS, TATA SUMO & PACKAGE TOURS

Room No. B/1, Dongre Sadan, Sakinaka, Mumbai - 400 072
Mob. : 9821624312, 9821752421, 9869073269
Res. : 5601 8030



Scanned with CamScanner

With Best Compliments From

*Jitendra*

# WESTERN BUSINESS CORPORATION

SALES / SERVICE - FAX, COMPUTER, KTS, EPABX, AMC
UNDERTAKEN

Shivner Sadan, Mohili Village,
Sakinaka, Mumbai - 400 072
Tel. No. 2859 29 48 / 49 Fax. : 2851 82 54

'विचार प्रसार'च्या अंकास हार्दिक शुभेच्छा !

# शिवनेर

## इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी

MS-CIT कोर्स

C-DAC चे विविध कोर्सेससाठी प्रवेश सुरू आहे त्वरा करा!

ही सुवर्णसंधी दवडू नका

**संपर्क**

८/१ए शिवनेर सदन, परेरा वाडी, साकीनाका,
मुंबई - ४०० ०७२ दूरध्वनी क्र. २८५१३३४५

With Best Compliments From

*Ignatius Fernandes*

*Umesh*

# FERN'S GARAGE

## AUTOMOBILE SERVICE CENTER

Specialist in

MECHANICAL, TIN JOB, PAINTING,
ELECTRICAL JOB OF
INDIAN & IMPORTED,
PETROL & DIESEL VEHICLES

Opp. Tata Infotech, B Cross Road, J. B. Nagar,
MIDC Andheri (E), Mumbai - 400 059
Mobile - 9892891107



हे मासिक मालक श्री. श्री. शंकर मुकुंद पोखरकर यांच्यासाठी प्रकाशक श्री. राजेंद्र ग. डोंगरे यांनी रिमता एंटरप्रायझेस, शिवनेर सदन, मोहीली व्हिलेजए साकीनाका, मुंबई - ७२ येथे छापून ७/१, डोंगरे सदन, परेरा वाडी, साकीनाका, मुंबई - ४०० ०७२ येथे प्रसिद्ध केले. (या मासिकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. संपादक नारायण डोंगरे - संपर्क : ९८९२७९१०६९ .

MAH/MAR/26477/131/2004-TC